# कन्फेशन !

मीना ! आता मध्यरात्रीचा सुमार आहे. टेबलावरच्या घड्याळात दीड वाजत आहे. वातावरणात नीरव शांतता भरलेली आहे. रातकिड्यांची किरकिर नि घड्याळाची टिक्‌टिक्‌ ह्या शिवाय कसलाच आवाज ऐकू येत नाही, लक्षपूर्वक ऐकल्यास ऐकू येतो तुझा संथ श्वासोच्छवास.....

मीना ! ह्या तुझ्या नाजुक देहात गेले पंधरा दिवस मुदतीच्या तापानं ठाण मांडलं होतं. वाताच्या झटक्यात तुला बिछान्यावर झोपवून ठेवणं अशक्य झालं होतं असं आता तुला कॉटवर निपचित पडलेलं पाहून खरंहि वाटणार नाही. पण देवाच्या दयेनं, डॉक्टरांच्या प्रयत्नांना यश आलं, दुपारपासून तुझ्या शरीरात उठलेलं वादळ शांत होऊ लागलं. ताप उतरणीस लागून डोळे झोपेनं मिटू लागले. मला हायसं वाटलं....... पण क्षणभर !

दुसऱ्याच क्षणी माझ्या मनात विचारांचं वादळ उठलं. तुझं वातातलं असंबद्ध बरळणं प्रतिध्वनिसारखं पुन्हापुन्हा कानांवर आदळत आहे असे भासू लागलं. त्या असंबंद्ध, विसंगत वाटणाऱ्या बरळण्यातली सुसंगती माझ्या लक्षात येऊ लागली. घडलेल्या घटनेचं स्पष्ट चित्र माझ्या मन:पटलावर स्पष्ट उभं राहिलं अन्‌ माझी आजवरची धुंदी उतरली.

आपल्या आयुष्याची फुलबाग बनविण्याच्या नशेत आपण आपल्या मुलीच्या जीवनाचं रखरखीत वाळवंट नकळत करीत आहोत हे माझ्या आजवर लक्षातच आलं नव्हतं, येणं अशक्यच होतं.

तारुण्याच्या ऐन उन्मादाचा तो काळ ! सामाजिक बंधनांना, नीतिनियमांना न जुमानणारं ते वय ! त्यातच मी आईवडिलांची अनिवार लाडानं वाया गेलेली एकुलती एक मुलगी !

शेजारीच राहत असलेल्या मेडिकल कॉलेजमधील रमेशवर मी ऐन विशीतच प्रेम करू लागले. चोरून, लपून आम्ही दोघं हिंडलो, फिरलो. दोघांनी मिळून सहली केल्या, सिनेमा नाटकं पाहिली, गाण्याच्या बैठकी ऐकल्या. फॅमिली रूम्समध्ये अनेक वेळा खाना घेतला....... त्या धुंदावलेल्या मन:स्थितीत त्या वर्षीची मॅट्रिकची परिक्षाही मी गमावली.

दुर्दैवाचा जबरदस्त आघात जर पुढे बसला नसता तर ह्या प्रेमप्रकरणानं कोणतं वळण घेतलं असतं कुणास ठाऊक ! पण कॉलऱ्याच्या एका जोरदार

साथीत आई-बाबा दोघंही एकदमच गेले, मला उघड्यावर टाकून ! त्याच साथीत मलाही काळानं ओढून नेलं नसतं तर ?........

पण तसं विधिलिखित नव्हतं. कदाचित् पूर्वजन्मीचं काही भोगायचं राहिलं असावं म्हणून मी वाचले. माझ्या मामांनी मला आपल्या गावी नेलं, कर्तव्याच्या भावनेनं ! आता पुढील शिक्षणाचा प्रश्नच उरला नव्हता. शिरावरील जबाबदारी उतरविण्याच्या घाईत त्यांनी तिथल्याच एका तरुणाशी माझं लग्न जमवून टाकलं.

हे इतक्या झटपट झालं की, आई-बाबांच्या अचानक मृत्यूनं हतबद्ध झालेल्या मला प्रथम काय चाललं आहे हेच नीट समजलं नाही. एखाद्या पाळीव जनावराप्रमाणे मामा सांगत तसं मी वागत होते......

पण लग्न ठरू लागताच मात्र मी भानावर आले. रमेशला त्याच्या पत्त्यावर मी अनेक पत्र पाठवली पण 'मालकाचा पत्ता लागत नाही' या शेऱ्याखाली ती सगळी परत आली. तो कोणत्यातरी वैद्यकीय मदत पुरविणाऱ्या सेवाशुश्रूषा पथकाबरोबर निरनिराळ्या ठिकाणी भटकत होता, असं मला मागाहून कळलं. पण त्यावेळी फार उशीर झाला होता. कारण त्याआधीच आगतिक होऊन मी समोर आलेल्या तरुणाच्या गळ्यात माळ घातली अन् होमातील अग्नीला आपल्या प्रेमाची आहुती अर्पण केली.

हा तरुण, म्हणजे तुझे वडील स्वभावानं कसे होते हे मला कधी कळलंच नाही, मीना ! कारण खऱ्या अर्थानं आमची मनं कधी जुळलीच नाहीत. एक तर ते फार अबोल ! इतके की, माझ्याशी, आपल्या बायकोशी सुद्धा ते कधी मोकळ्या मनानं बोलले नाहीत. दुसरं म्हणजे, लहानपणापासून पोरकेपणानं वाढल्यामुळे असेल कदाचित, पण ते कधी चारचौघात मिसळत नसत. आपण बरे की आपली पोटापाण्याची नोकरी बरी अशी त्यांची वृत्ती. इतर गोष्टीत त्यांनी कधी रस घेतल्याचं मला आठवत नाही. शिवाय, खरं सांगायचं तर त्यांना जाणून घ्यायचा मी कधी प्रंयत्नच केला नाही. मी आपल्याच दुःखात चूर होते, विफल प्रेमाच्या यातना अनुभवत होते, साहत होते, अन् त्यांच्याकडे पाहण्याची माझी दृष्टीही आपल्या दुर्दैवाला जबाबदार असणारी व्यक्ती अशी झाली होती.... अकारण !

लग्नानंतर एक वर्षाने तुझा जन्म झाला. तेव्हापासून अखेरपर्यंत तुझ्यावर मात्र त्यांनी अगदी वेडी माया केली, पोरी ! फावल्या वेळात ते तुलाच घेऊन

बसायचे. तुला खेळवायचे, तुला बाललीलात रमायचे.....

मीना ! पुढचं तुला माहीतच आहे. तू तीन वर्षांची असतानाच तुझ्या वडिलांना काळानं अचानक ओढून नेलं नि मी पुन्हा निराधार झाले. ह्यांना जवळचं कुणीच नव्हतं अन् मामींच्या नाराजीच्या भीतीने माझ्या मामांनीही मला आश्रय देण्याची गोष्टच काढली नाही. अशा वेळी डॉक्टरकाकांनी अगदी वेळेवर आधार दिला नसता तर आपलं कसं झालं असतं याची कल्पनाच करवत नाही.

त्यांना जेव्हा माझ्यावर कोसळलेल्या आपत्तीची बातमी कळली तेव्हा ते तातडीने धावून आले. त्यांनी आपणहून जिव्हाळ्यानं विचारपूस केली. मला नर्सिंगच शिक्षण घेण्याचा व आपल्या पायावर उभं राहण्याचा त्यांनी सल्ला दिला. इतकंच नव्हे तर मी ते शिक्षण सुरू केल्यावर ते पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी लागेल ती मदत केली आणि मी ती परीक्षा पास झाल्यावर मला आपल्याच हॉस्पिटलमध्ये नोकरीला ठेऊन घेतलं.

मीना ! हे डॉक्टरकाका म्हणजेच तो पूर्वीचा रमेश अन् आताचा रमेशचंद्र घारे हे आता तू ओळखलंच असशील. एम.बी.बी.एस.ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर योगायोगानं त्यांनी आपण होतो त्याच गावात नुकताच आपला दवाखाना थाटला होता. माझं लग्न होऊन मी हि त्याच गावात संसार करीत आहे हे त्यांना कळलं होतं, पण त्यांनी कधी ओळख काढली नाही की ते कधी घरी आले नव्हते, ह्यांचं निधन होण्यापूर्वी !

त्यांचं लग्न झालं असून त्यांना एक मुलगाही आहे अन् सासऱ्याच्या मदतीनं ते आपल्या दवाखान्याचं रूपांतर हळूहळू खाजगी हॉस्पिटलमध्ये करीत आहेत असं मलाही त्या सुमारास इकडून तिकडून कळालं होतं. पण ही सारी माहिती मिळूनही मी कधी त्यांना भेटण्याचा विचार केला नव्हता, की माझ्या मनात पूर्वीच्या प्रेमाची भावना उफाळली नव्हती......

ह्याचं कारण, कदाचित तुझे वडील असेपर्यंत त्यांचा माझ्या मनावर असलेला धाक हेही असेल किंवा त्यावेळी तुझ्या लालनपालनात अन् कोडकौतुकात माझ्या मनात डॉ. रमेशबद्दल थाराच मिळाला नसावा हे असेल. शिवाय डॉ. रमेशनंही माझ्या जीवनात तुझे वडील असेपर्यंत शिरण्याचा प्रयत्न केला नाही. अन् म्हणूनच आमचं दोघांचं लग्नापूर्वीचं ते प्रेमप्रकरण दोघांच्याही दृष्टीनं जणू काही भूतकाळात गाडलं गेलं होतं.

पण डॉक्टरांचा माझ्या आयुष्यात परत प्रवेश झाल्यावर त्यांच्या

सहसवासात गाडल्या गेलेल्या प्रेमाला पुन्हा अंकुर फुटू लागला. नकळत !

एकाच व्यवसायात असल्यानं बराच वेळ घडणारा सहवास, आसन्नमरण रोग्यांजवळ शेवटपर्यंत उपचार करण्यासाठी दोघांनी मिळून केलेली रात्ररात्र जागरणं, ऑपरेशन्स, जीवनमरणाच्या संघर्षाचे जोडीनं अनुभवलेले रोमांचित करून सोडणारे झगडे, व्हिजिट्ससाठी गावीपरगावी घडणाऱ्या ट्रीप्स इत्यादींमुळे आम्ही परस्परांच्या अतिशय जवळ आलो आणि लवकरच आम्हाला कळून चुकलं की, अंकुरलेल्या रोपाचा वाढीस लागून आता वृक्ष झालाय. आपलं संपूर्ण मन त्यानं व्यापून टाकलंय.

अकाली वैधव्य, तरुण शरीर अन् प्रियकराचं पुनर्मीलन ह्यामुळे माझ्या मनात ओढ निर्माण झाली ह्यात नवल नव्हतं. पण डॉक्टरांची पत्नी इतकी सुस्वरूप असूनसुद्धा ते माझ्यासारख्या साधारण स्त्रीकडे कसे ओढले गेले ह्याचंच मला कोडं पडलं होतं. त्यांच्या बायकोला जेव्हा मी प्रथम पाहिलं तेव्हा मूर्तिमंत सौंदर्य जणू स्त्री रूपानं उभं आहे असं मला वाटलं.

पुढे मला कळलं की, ह्या सुंदर शरीरातील मन डॉक्टरांच्या बाबतीत अगदी थंड आहे, निर्विकार आहे ! एकांतातसुद्धा न फुलणारे आहे. एखाद्या काष्ठपुतळीशी मीलन व्हावं अशी दरवेळी त्यांना भावना होई. त्यांना शरम वाटे, त्यांचा हिरमोड होत असे....

प्रथम त्यांनी तिचा अनुनय करण्याचा खूप प्रयत्न केला. वाटेल ती इच्छा पुरवून तिला फुलवून पाहिलं. पण ती कधी फुललीच नाही. खुललीच नाही. तिनं कधी आपणहून आपली हौस सांगितली नाही की विश्वासानं व्यथा उघड केली नाही. एखाद्या यांत्रिक बाहुलीशी त्यांचा संसार चालला होता.....

प्रयत्न करूनही डॉक्टरांना तिच्या थंड अलिप्ततेचं कारण शोधता आलं नाही. नंतर त्यांच्या जीवनात माझा प्रवेश झाल्यावर त्यांनी तो प्रयत्नच सोडून दिला.

त्यांच्या वैवाहिक जीवनाची ही बाजू जशी मला त्यांच्याकडून पुढे कळली तशी माझ्या मनात कालवाकालव झाली. माझं मन अपार करुणेनं भरून आलं. डॉक्टरांबद्दल वाटणाऱ्या प्रेमाला हा एक नवा उन्मेष फुटला. मी त्यांच्यावर उत्कट प्रेम करू लागले, सारं सारं विसरून !

पण अजून संयमाची लक्ष्मणरेषा माझ्याकडून ओलांडली गेली नव्हती. विवेकाच्या बांधाला अजून बारीकशीहि चीर पडलेली नव्हती. पण मनावर

भयंकर तणाव आला होताच अन् तितक्यातच तो प्रसंग घडला.

मीना ! ह्यावेळी जशी तू अतिशय आजारी झाली तशीच आठनऊ वर्षांची असताना एकदा झाली होतीस. इवल्याशा देहात पाच साडेपाच पर्यंतच्या तापानं ठाण मांडलं होतं. वात झाला होता. दात, ओठ काळे पडले होते अन् सर्वात वाईट चिन्ह म्हणजे तू एक क्षणसुद्धा झोपत नव्हतीस. डॉक्टरकाकांनी नाना तऱ्हेची औषधं, इंजेक्शन देऊन पाहिली. सतत बारा दिवस ते अतिशय परिश्रम करीत होते. पण ताप उतरत नव्हता. झोप लागत नव्हती. माझ्या मनाने तर आशाच सोडली होती. त्याच व्यवसायात असल्यानं, माहिती असलेल्या ज्ञानाच्या आधारानं मला ह्या आजाराचा शेवट आधीच कळला होता. डॉक्टरकाकांचं धीर देणं माणुसकीला धरून आहे हे मला समजू शकत होतं. पण त्यांचाही धीर खचत आला होता, हे मला दिसत होतं. सुटी घेऊन आपल्या घरी तुझी शुश्रुषा करीत राहणं याशिवाय माझ्या हातात काही उरलं नव्हतं. अन् सुन्न मनानं मी तेच करीत होते. माझे डोळ कोरडे पडले होते, जळजळत होते.....

आजाराची बारावी रात्र ! नेहमीप्रमाणे डॉक्टरकाका घरी आले. त्यांनी तुला तपासलं. तुझी नाडी तपासली. काहीवेळ गंभीर होऊन ते तसेच बसून राहिले. कॉटवर ! मग एक नवीन औषधी ट्यूब त्यांनी आपल्या बॅगमधून बाहेर काढली अन् ते इंजेक्शन त्यांनी तुला टोचलं. तुझ्या नाडीवर बोटं ठेवून बारकाईनं ते तुझा चेहरा न्याहाळू लागले. फरक आजमावू लागले......

मी पाहात होते ! जळजळणाऱ्या डोळ्यांनी नि शून्य मनानं ! साऱ्या संवेदना गोठून गेल्यासारखी !!

नवीन इंजेक्शनचा परिणाम हळूहळू दिसून येऊ लागला. कोपऱ्यात जाऊन बसलेली बुबुळं हालचाल करू लागली. चेहऱ्यावरची प्रेतकळा कमी होऊ लागली. जिवंतपणाच्या खुणा त्यावर उमटू लागल्या. तू कण्हू लागलीस. मी यांत्रिकपणेच थोडासा मोसंबीचा रस तुझ्या ओठांशी धरला. ती तू घटघट प्यायलीस. अन् नंतर तुला झोप येऊ लागली. हळूहळू तुझ्या पापण्या मिटू लागल्या. तुला सपाटून घाम येऊ लागला. तो पुसता पुसता मला पुरेवाट होऊ लागली. डॉक्टरकाकांनी थर्मामीटर लावून ताप पाहिला. तो उतरू लागला होता. काही वेळानं तू शांत झोपलीस.

तुला घाम आलेला मी पाहिला. तू स्वस्थ झोपलेली मला दिसलीस अन् माझे जळजळणारे डोळे अश्रुंनी भरून आले, अनावर होऊन वाहू लागले.

शोकाचे उमाळ्यावर उमाळे मला येऊ लागले. अंग थरथर कापू लागलं, दृष्टि अंधूक झाली. भावनेच्या एका लाटेसरशी मी डॉक्टरांच्या पायावर पडले.... गदगदून रडू लागले. क्षणभर मी भान विसरल्यासारखी झाले....

मी भानावर आले तेव्हा मला दिसून आलं की, मी डॉक्टरांच्या मिठीत आहे ! माझं शरीर किंचित थरथरलं. मी वर पाहिलं. त्यांच्या डोळ्यात मजबद्दलची प्रीति अन् करूणा यांची मिश्र भावना तरळत होती, मला पुन्हा भडभडून येऊन मी त्यांच्या छातीवर डोकं टेकलं. त्यांचा सहानुभूतीचा हात माझ्या पाठीवरून हलके हलके फिरू लागला.....

हळूहळू माझ्या शोकाचा आवेग कमी झाला अन् माझ्या मनात डॉक्टरांविषयीचं प्रेम जागृत होऊ लागलं. क्षणभर साऱ्या परिस्थितीचा मला विसर पडला. माझं मुख पुन्हा वर झालं अन् माझ्या नजरेत त्यांची नजर पुन्हा मिसळली. दुसऱ्याच क्षणी त्यांची माझ्या शरीराभोवतीची मिठी अधिकच दृढ झाली अन् त्यांनी माझं रसरसून चुंबन घेतलं ! वासनेची एक जबरदस्त लाट त्या क्षणी आमच्या देहांवर चढून आली. आम्ही तीत पूर्ण न्हाऊन निघालोच असतो. इतके दिवस थोपवून धरलेली भावनेची नदी बांध फोडून वाहू लागलीच असती...

पण इतक्यात तू किंचित कण्हलीस नि मी एकदम भानावर आले. मिठी सोडवून तडक तुझ्या बिछान्याकडे धावले. उशाशी बसून तुला आलेला घाम खालच्या मानेनं पुसू लागले. डॉक्टरांनाही अपराधीपणाच्या भावनेनं ओशाळून आलं. पुन्हा माझ्याकडे न पाहता ते तडक निघून गेले. मला सुटल्यासारखं वाटलं.....

मी सुटले असं त्यावेळी मला वाटलं असलं तरी उलट त्या प्रसंगानंतर डॉक्टरांबद्दल माझी आसक्ती वाढतच गेली. त्या प्रसंगानं माझ्या मनावर घातलेल्या बांधाला भेग पडली होतीच. म्हणूनच त्यांच्याबद्दलची प्रीति अन् त्यांच्याबद्दल करुणा ह्या मिश्र भावनेच्या भरात नकळतच माझ्याकडून पुढे लवकरच विवेकाची लक्ष्मणरेषा उल्लंघिली गेली अन् त्यानंतर उतरणीवरून घसरणाऱ्या शिळेप्रमाणे मी अध:पतनाच्या दरीत वेगानं कोसळले........

नंतरच्या काळात एखाद्या नशा केलेल्या माणसासारखी माझी स्थिती झाली होती. प्रीतीचे साफल्य झाल्याच्या एका अनिर्वचनीय उन्मादात मी एक विसरले की, मी आई आहे. अन् आपल्या अशा वागण्याचा आपल्या मुलीच्या कोवळ्या मनावर काही वाईट परिणाम होईल.......

तरी पण तुला कळू लागण्याच्या आत मी तुला शिक्षणाच्या निमित्तानं दूर ठेवलं. कॉन्व्हेंटच्या शाळेत तुझं शिक्षण झालं अन् वसतिगृहात तुझं बालपण गेलं.........

उन्हाळ्याच्या सुट्टीत तू माझ्याजवळ फक्त दोन महिने असायची. तेव्हा मात्र तुझ्या नजरेस काही वावगं दिसू नये म्हणून मी खबरदारी घ्यायची. तरीपण तुझ्या कानावर लोकात पसरलेल्या माझ्याबद्दलच्या अफवा यायच्याच. पण आपल्या परिचारिकेच्या व्यवसायाला असलेल्या अशा शापावर त्यांचं खापर फोडून मी तुझी मनोभूमिका फार आधीपासून तयार करून ठेवली होती. मी स्वतः ही कष्टाची नोकरी करून तुला वाढवते आहे, शिकवते आहे. अशा तऱ्हेची बदनामी सुद्धा तुझ्याकरता सोसते आहे असंच मी भासवत होते. अन् माझ्यावर तुझा गाढ विश्वास होता, श्रद्धा होती. डॉक्टरकाकांच्याबद्दल तुझ्या ठिकाणी आदराची भावना होती.

मीना ! मनुष्य मोहाच्या आधीन झाल्यावर किती खालच्या पातळीवर येतो ह्याची तुला आता कल्पना येऊ लागलीच असेल. पापी माणसाजवळ सुद्धा आपल्या कृत्याचं एक विशिष्ट समर्थन असतं. पण त्यानं तो फक्त स्वतःलाच फसवीत असतो; इतरांना नाही ! माझं ही तसंच झालं होतं.

डॉक्टरांवर माझं एकनिष्ठ प्रेम आहे. अन् त्यांना सुखी करण्यासाठी वाटेल तो त्याग करणं आपलं कर्तव्य आहे अशी मी मोठी उदात्त कल्पना करून घेतली होती. जणू काही ह्या भावनेच्या वरती दुसरी उदात्त भावना काही असूच शकत नव्हती. कूळशील, नीति, अनीति, पावित्र्य, आईचे कर्तव्य वगैरे गोष्टी त्यापुढे भाकडकथा होत्या.

पण वर मी असा कितीही आव आणला तरी मी स्वतःच्या विवेक बुद्धीला पूर्णतः फसवू शकले नव्हते. तुझ्यापासून खरं लपवून ठेवण्याचा प्रयत्न म्हणूनच मी करत होते. तुला दूर ठेवण्याचा माझा उद्देश आपली तुझ्या मनातील प्रतिमा डागाळू नये हाच होता. त्या दिशेने माझे प्रयत्न असत...... पण स्वतःलाही नकळत !

कसलंहि बंधन नाही, कोंडमारा नाही, संसारी स्त्रीच्या मागच्या विवंचना नाहीत. भरपूर काम अन् नंतर जीवनाचा सर्वांगाने उपभोग ! रमेशच्या आधारानं त्याच्या प्रेमाच्या उबेत !! या आसुरी सुखाचा मोह इतका जबरदस्त होता की, एखाद्या मोहनिद्रेत असलेल्या व्यक्तिसारखी माझी स्थिती झाली होती. एक

प्रकारच्या उन्मादात मी आजवर जगत होते.........

त्या उन्मादात मी एक विसरले की माझ्या मुलीलाही ह्या समाजात राहायचं आहे, मोठं व्हायचं आहे, आपल्या आवडीप्रमाणे आयुष्याचा जोडीदार निवडून त्याच्याबरोबर त्याच्या प्रेमाच्या सावलीत जीवनाची वाटचाल करायची आहे........ हा तिचा हक्क आहे अन् त्याच्याआड आपण येऊ शकत नाही. आपल्या आयुष्यात वसंतऋतु फुलविण्याचा अधिकार बजावताना आपल्याला तो अधिकार आपल्या मुलीला नाकारता येत नाही. तिचं आयुष्य आपल्यामुळे वैराण होता कामा नये !........

अन् ह्या आजारातील वातात तू जे बरळत होतीस त्यावरून मला कळलं की, तसंच झालं आहे !!

मला कळलं की, ह्या उन्हाळ्याच्या सुटीत तुझं नि अजय जोशीचं एकमेकावर प्रेम बसलं होतं. त्यानंच पुढाकार घेऊन तुझं मन जिंकलं होतं. तुम्ही दोघांनी आणा शपथाही घेतल्या होत्या......

पण पंधरा दिवसांपूर्वी, तुम्ही दोघं संध्याकाळी फिरायला गेले असताना तू विवाहाची मागणी करताच त्यानं एक अट घातली होती.....

"आपल्या आईपासून अलग होण्याची, लग्नाआधी नि नंतरही तिच्याशी आपले संबंध तोडण्याची ! नातं तोडण्याची !!.... माझ्या चारित्र्याचं कारण सांगून. चारचौघात माझ्याबद्दल पसरलेल्या अफवेचा आधार घेऊन !!!

तू संतापानं थरथरू लागलीस. त्या भरात तू अजयला नाही नाही ते बोललीस. तो दुबळा आहे, भेकड आहे, फसवा आहे असे आरोप तू त्याच्यावर केलेस. आपल्या आईवर केलेल्या आरोपाची तुला चीड आली. बालपणापासून जोपासलेल्या श्रद्धेला त्यानं तडे द्यायचा प्रयत्न करताच आत्यंतिक संतापानं तू बेभान झालीस. आपल्या आईवर घाणेरडे आरोप करणाऱ्याशी तू त्या उर्मीत संबंध तोडलेस....

संतापानं फणफणत अन् प्रेमभंगाच्या दारूण धक्क्यानं कोलमडलेली अशी तू त्या रात्री घरी परतलीस अन् आपल्या बिछान्यावर कोसळलीस. तुझी शुद्ध गेली अन् अंगात ताप चढू लागला... त्या शेवटच्या भेटीनंतर गेले पंधरा दिवस तू भयंकर आजारी झालीस....

पोरी ! ज्या क्षणी मला हे कळलं की, तुझ्या ह्या अवस्थेस कारणीभूत मी आहे, तुझ्या प्रेमात विष कालवणारी दुष्टा, आईच्या वेषातली वैरीण मीच

आहे, त्याच क्षणी माझी आजवरची धुंदी उतरली. आपल्याच सुखाच्या वर्तुळात गोलगोल फिरणारं माझं मन बाहेर ओढलं गेलं. त्याची बेहोषी उतरली. स्वसुखाच्या ध्यासापायी आपण आपल्या मुलीचा गळा कापला असं दिसून येताच अपराधीपणाच्या भावनेनं त्याचा ठाव घेतला. विवेक बुद्धीनं त्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करून आपल्या प्रश्नाचे आसूड त्याच्या पाठीवर ओढावयास सुरुवात केली. अन् त्याची लक्तरं लोंबायला लागली. रामशास्त्र्याच्या न्यायनिष्ठुरतेनं त्याला शिक्षा फर्मावली गेली, 'आपल्या अपराधाची स्वतःच्या मुलीला कबुली दे ! अन् तिच्या आयुष्यातून, प्रेमाच्या मार्गातून कायमची निघून जा !! परागंदा हो !!!.....

मीना ! चर्चमध्ये, पुण्यात्मस्वरूप फादरसमोर आपल्या पापाचं 'कन्फेक्शन' स्वमुखानं देताना माणसाच्या आत्म्याला किती असह्य यातना होत असतील ! पण माझ्यासारख्या दुबळ्या अन् शरमेनं मेल्याहून मेल्या झालेल्या स्त्रीला तेवढा ताण सहन करण्याची ताकद नाही अन् म्हणून मी हा मार्ग पत्करला आहे.

ज्यावेळी तुझ्या हातात हे 'कन्फेक्शन' पडेल त्यावेळी मी तुझ्यापासून फार फार दूर निघून गेलेली असेन.... अशा ठिकाणी की ज्याचा पत्ता कुणालाही कधीच माहीत होणार नाही.

तरी पण एक सल माझ्या मनात नेहमीच सलत राहील की ह्यानं माझं पाप धुऊन निघेल का ?......

---